चाणक्य मंडल परिवार

# MPSC

## प्रचलित घडामोडी

### *स्पेशल कोर्स (मराठी)*

Headlines: २१ ऑक्टोबर ते ११ नोव्हेंबर २०१९

१२ नोव्हेंबर २०१९



# हेडलाईन्स

## मुंबईतील तीन वास्तूंना युनेस्कोचा पुरस्कार

- मुंबईतील फ्लोरा फाऊंटन, नेसेट एलियाहू सिनेगॉज, अवर लेडी ऑफ ग्लोरी चर्च, अहमदाबादमधील विक्रम साराभाई लायब्ररी आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (IIM) या चार हेरिटेज वास्तूंना युनेस्कोचा यंदाचा एशिया पॅसिफिक पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.
- सांस्कृतिक वारसास्थळांचे जतन, संवर्धन यासाठी युनेस्कोकडून दरवर्षी पुरस्कार दिले जातात.
- यंदा भारत, चीन, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडमधील 16 वास्तूंना हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.
- या पुरस्कारासाठी 14 देशांमधून 57 वास्तूंची नोंदणी करण्यात आली.
- विक्रम साराभाई लायब्ररी आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट या वास्तूला डिस्टिंक्शन विभागात पुरस्कार मिळाला आहे.
- मेरिट या विभागात नेसेट एलियाहू सिनेगॉस आणि अवर लेडी ऑफ ग्लोरी चर्च या वास्तूंना पुरस्कार जाहीर झाला.

### UNESCO (United Nations Educational Scientific and Cultural Organisation)

- मुख्यालय : पॅरिस (फ्रान्स)
- सदस्य : 193, सहयोगी 11 देश
- प्रकार : विशेषज्ञ संस्था
- अध्यक्ष : आंद्रे अनोले
- स्थापना : 4 नोव्हेंबर 1945
- 1946 मध्ये भारत सदस्य बनला.
- युनेस्कोची 27 क्लस्टर कार्यालये व 21 राष्ट्रीय कार्यालये आहेत. जगभरातील 332 आंतरराष्ट्रीय स्वयंसेवक संघटनांशी युनेस्कोचे संबंध आहेत.
- भारतामध्ये एकूण 38 जागतिक वारसास्थळे आहेत. (ऑक्टोबर 2019 नुसार)
- 38 वे : राजस्थानमधील जयपूर शहराचा समावेश जागतिक वारसास्थळांच्या यादीत नव्याने केला गेला आहे.
- 37 वे : दक्षिण मुंबईतील व्हिक्टोरियन गॉथिक आणि आर्ट डेको इमारती
- जुलै 2018 पर्यंत युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत जगातील 167 देशांतील 1092 वारसा स्थळांचा समावेश होता.
- जागतिक वारसा स्थळांमध्ये भारतातील 38 स्थळांचा समावेश आहे.
- यामध्ये 30 सांस्कृतिक स्थळे, 7 नैसर्गिक स्थळे आणि 1 मिश्र वारसा स्थळ आहे.

## जागतिक भूक निर्देशांक – 2019

- 2019 या वर्षासाठीचा जागतिक भूक निर्देशांक जाहीर झाला. यात भारत 117 देशांच्या यादीत 102 व्या क्रमांकावर आहे.

**अहवाल कोण प्रकाशित करते?**

- वेल्थ हंगर हिल्फ (जर्मनी)
- कन्सर्न वर्ल्डवाइड (आयर्लंड)
- 2018 साली भारताचा क्रमांक 103 होता.

**या अहवालानुसार :**

- उपासमारीच्या आधारावर भारताला 30.3 गुण मिळाले.
- भारतात उपासमारीची स्थिती 'गंभीर' आहे.
- भारतातील 6 ते 23 महिने वयोगटातल्या केवळ 9.6% मुलांना पौष्टिक आहार मिळतो.
- 39% कुटुंबात स्वच्छतेची सुविधाच नाही.
- मात्र 5 वर्षांखालील बालकांचे मृत्यू प्रमाण, कुपोषण या बाबतीत सुधारणा घडली आहे.
- बेलारूस, युक्रेन, टर्की, क्यूबा, कुवैत देश अग्रस्थानी असून आफ्रिकेतील येमेन व जिबुती देश सर्वात खाली आहेत.

**आशियातील अन्य देशांचा क्रम :**

चीन – 25
नेपाळ – 73
बांगलादेश – 88
पाकिस्तान – 94

- या देशांची स्थिती भारतापेक्षा चांगली आहे.
- देशातील भुकेच्या स्थितीवरून 'जागतिक भूक निर्देशांक' मध्ये देशांना असे गुण दिले जातात.
- यात 0 गुण सर्वोत्तम समजले जातात.

**रचना :**

| गुण | भूकेची स्थिती |
|---|---|
| 0 | काळजी करण्यासारखी नाही. |
| 10 पेक्षा कमी | फारशी गंभीर नाही. |
| 20 ते 34.9 | गंभीर संकट |
| 35 ते 49.9 | आव्हानात्मक |
| 50 पेक्षा जास्त | भयावह स्थिती |

**अहवालासाठी विचारात घेतले जाणारे घट :**

- कमी पोषण , उंचीच्या तुलनेत कमी वजन
- 5 वर्षांखालील मुलांची वाढ खुंटणे
- कुपोषण, बालमृत्युदर (5 वर्षांखालील) इ. घटक

## अलिप्ततावादी चळवळ शिखर परिषद 2019

- अलिप्ततावादी चळवळ शिखर परिषद 2019 ही 25 ते 28 ऑक्टोबर रोजी बाकू (अजरबैजान) येथे आयोजित करण्यात आली होती.
- ही NAM ची 18 वी परिषद होती.

**अलिप्ततावादी चळवळीविषयी :**

- अलिप्तता हा शब्दप्रयोग प्रथम पंडित नेहरूंनी 1954 मध्ये कोलंबोतील एका भाषणात केला.
- आंतरराष्ट्रीय क्षेत्रात लष्करी स्वरूपाच्या व गटातटाच्या राजकारणापासून अलिप्त राहणे म्हणजे अलिप्ततावाद होय.
- 'अलिप्ततावादाचे उद्गाते' असे नेहरूंना संबोधले जाते.
- 1955 साली इंडोनेशियातील बांडुंग येथे भरलेल्या आफ्रो-आशियाई राष्ट्रांच्या परिषदेला या चळवळीचा प्रारंभबिंदू मानला जातो.
- या चळवळीचा उद्देश कोणत्याही देशांच्या (अमेरिका किंवा रशिया) गटात सामील न होता तटस्थ राहणे हा होता.
- ही चळवळ उभारण्यासाठी भारताचे पंतप्रधान जवाहरलाल नेहरू व युगोस्लाव्हियाचे राष्ट्रपती जोसेफ ब्रोजटिटो यांनी महत्त्वाची भूमिका निभावली.

## आंतरराष्ट्रीय सौर युतीत इरिट्रिया सहभागी

- इरिट्रियाच्या समावेशामुळे आता International Solar Alliance च्या सदस्यांची संख्या 83 झाली आहे.

**काय आहे ISA?**

- ISA (International Solar Alliance) ची सुरुवात भारत आणि फ्रान्स या दोन देशांनी नोव्हेंबर 2015 मध्ये केली.
- हा करार डिसेंबर 2017 मध्ये लागू झाला.
- 11 मार्चला ISA चा स्थापना दिवस साजरा केला होता.
- ISA चे मुख्यालय गुरगाव (हरियाणा) येथ आहे.
- कर्कवृत्त व मकरवृत्त यांच्यामधील 121 देशांना सौर ऊर्जा उत्पादनासाठी प्रोत्साहित करणे हा ISA चा उद्देश आहे.
- 2030 पर्यंत सौर ऊर्जा उत्पादन वाढविण्यासाठी 1000 अब्ज डॉलर्सची उभारणीही ISA करणार आहे.
- उष्णकटिबंधीय भागात येणाऱ्या देशांव्यतिरिक्त जगातील कुठलाही देश आता ISA मध्ये सहभागी होऊ शकतो.

## 8 वी भारत-जर्मनी ऊर्जा परिषद

- 8 वी भारत-जर्मनी ऊर्जा परिषद दिल्ली येथे पार पडली.
- या परिषदेत कोळशापासून तयार होणाऱ्या ऊर्जेवर व त्यांच्या दक्षतेवर चर्चा केली गेली.
- 2015 मध्ये स्थापन झालेल्या इंडो-जर्मन सौर भागीदारीवर या परिषदेत मान्यता देण्यात आली.
- या परिषदेची स्थापना 2006 मध्ये केली होती.
- या बैठकीचे अध्यक्षस्थान दोन्ही देशांचे पर्यावरण व नवीकरणीय ऊर्जामंत्री भूषवतात.

## भारत-आसियान शिखर परिषद 2019

**ASEAN (आसियानविषयी)**

- Association of South-East Asian Nations
- स्थापना : 8 ऑगस्ट 1967
- मुख्यालय : जकार्ता (इंडोनेशिया)
- उद्दिष्ट : आर्थिक वाढ, सामाजिक विकास, सांस्कृतिक विकास करणे तसेच सदस्य राष्ट्रांकडे शांतता व स्थैर्य टिकवणे.
- ASEAN सदस्य देश एकूण 10 आहेत.
- इंडोनेशिया, फिलिपिन्स, मलेशिया, थायलंड, सिंगापूर, ब्रुनी, व्हिएतनाम, लाओस, म्यानमार, कंबोडिया.

- **2019 च्या परिषदेविषयी :**
- स्थळ : बँकॉक, थायलंड 3 नोव्हेंबर 2019 रोजी संपन्न
- भारताद्वारे 1 अब्ज डॉलरचे सहाय्य
- या परिषदेत भारताने निळी क्रांती व समुद्र सुरक्षा यावर विशेष भर दिला.
- 2020 चे संमेलन व्हिएतनाम येथे होणार आहे.

## जागतिक आनंदी अहवाल, 2019
## World Happiness Index, 2019

- सुरुवात : 2012 पासून (यावर्षीचा 7 वा अहवाल)
- संयुक्त राष्ट्राच्या UN Sustainable Development Solutions Network मार्फत हा अहवाल सादर केला जातो.
- 2019 ची थीम Happier Together
- 156 देशांच्या यादीत भारत 140 व्या क्रमांकावर आहे. (2018-133 वा, 2017-122 वा, 2016-118 वा)

**2019 च्या अहवालानुसार सर्वात आनंदी 3 देश :**

1. फिनलंड (सलग दुसऱ्यांदा)
2. डेन्मार्क
3. नॉर्वे

**शेवटचे सर्वात दुःखी तीन देश :**

1. दक्षिण सुदान (156)
2. मध्य आफ्रिकन गणराज्य (155)
3. अफगाणिस्तान (154)

**भारताच्या शेजारील राष्ट्रांचा क्रमांक :**

- नेपाळ (100), भूतान (95), श्रीलंका (130), पाकिस्तान (67), चीन (93), बांगलादेश (125)

**हा अहवाल खालील निकषांवर आधारित असतो.**

- सकल देशांतर्गत उत्पन्न (GDP), सामाजिक आधार, निरोगी जीवन अपेक्षितता, जीवन संधीविषयक स्वातंत्र्य, विश्वास किंवा भ्रष्टाचाराचा अभाव, उदारपणा

## मुंबई आणि हैदराबादला युनेस्कोकडून क्रिएटिव्ह शहरांचा दर्जा

- संयुक्त राष्ट्रांच्या युनेस्को या संस्थेने नुकताच मुंबई शहराला चित्रपट क्षेत्रात आणि हैदराबाद या शहराला पाककला क्षेत्रात क्रिएटिव्ह सिटीज नेटवर्क (UNESCO's Creative Cities Network : UCCN) चा दर्जा देण्यात आला.
- आता ही दोन शहरे मिळून (UCCN) ची सदस्य असलेल्या भारतीय शहरांची संख्या 5 झाली आहे.

**UCCN मध्ये समाविष्ट भारतातील शहरे खालीलप्रमाणे**

1. जयपूर : शिल्पकला व लोककला (2015)
2. वाराणसी : संगीतासाठी रचना (2015)
3. चेन्नई : संगीतासाठी रचनात्मक शहर (2017)
4. मुंबई : चित्रपट क्षेत्र (2019)
5. हैदराबाद : पाककला (2019)

- UCCN ची स्थापना 2004 मध्ये करण्यात आली होती. यामध्ये जी शहरे आपापल्या देशांत सांस्कृतिक घडामोडींचा सक्रिय केंद्रबिंदू असतात, अशा शहरांचा समावेश केला जातो.
- UCCN मध्ये सध्या एकूण 246 शहरांचा समावेश आहे.

## युनायटेड नेशन्सचा 'फिड अवर फ्यूचर' कार्यक्रम

- युनायटेड नेशन्स वर्ल्ड फूड प्रोग्रॅमने (WFP) भारतात जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि उपासमार व कुपोषणाविरुद्ध पावले उचलण्यासाठी 'फीड अवर फ्यूचर' अशी चित्रपट जाहिरात मोहीम UFO मूव्हीजच्या सहकार्याने सुरू केली आहे.
- ही जाहिरात मोहीम जगातील कोट्यवधी लोक सामना करत असलेल्या वास्तविकता दर्शवेल.

**मोहिमेबद्दल :**

- उद्दिष्ट : जनजागृती करणे आणि भारतात भूक आणि कुपोषणाविरुद्ध पावले उचलणे.
- World Food Programme (WFP) ही संयुक्त राष्ट्रांची अन्न सहाय्य शाखा आणि जगातील सर्वांत मोठी मानवतावादी संस्था असून अन्नसुरक्षेला उत्तेजन देणारी संस्था आहे. WFP अन्नपुरवठ्याची गरज दूर करण्याच्या अंतिम उद्दिष्टाने भूक व कुपोषण निर्मूलनासाठी प्रयत्न करते.
- ही संघटना संयुक्त राष्ट्र विकास गटाचे सदस्य आणि कार्यकारी समितीचा एक भाग आहे. 1961 मध्ये स्थापन झालेल्या WFP ने जगासाठी एक दृष्टिकोन बाळगला आहे. ज्यामध्ये जनतेमधील प्रत्येक घटकाला पोषक व संतुलित आहार मिळावा यासाठी प्रयत्न केला

जातो.

**जागतिक अन्न कार्यक्रमाची उद्दिष्टे :**

- आत्पकालीन परिस्थितीत जीव वाचवणे.
- अन्नसुरक्षा आणि पोषण या क्षेत्रात काम करणे.
- अन्न जोखीम कमी करणे, लोक समुदाय आणि देशांना स्वत:चे अन्न आणि पौष्टिक गरजा भागवण्यासाठी सक्षम करणे.
- 2030 पर्यंत 'Zero Hunger' लक्ष्य गाठणे.

**World Food Programme (WFP)**

- WFP च्या अहवालानुसार WFP जगातील 83 देशांमधील सरासरी 91.4 दशलक्ष लोकांना अन्नसहाय्य पुरवते.

**WFP स्थापना :** 19 डिसेंबर 1961

**मुख्यालय :** रोम, इटली

**प्रमुख :**

- डेव्हिड बेसले (2017 ते आतापर्यंत)
- 13 वे कार्यकारी संचालक
- 12 वे एर्थरिन कॉसीन (2012-2017)

## RCEP करारावर स्वाक्षरी करण्यास नकार भारत सरकारचा शेतकरी व्यापाऱ्यांना दिलासा

- शेतकरी आणि छोट्या व्यापाऱ्यांना दिलासा देणारा महत्त्वपूर्ण निर्णय केंद्रातील मोदी सरकारने घेतला आहे. प्रादेशिक व्यापक आर्थिक भागीदारी करारात भारत सहभागी होणार नसून त्यावर स्वाक्षरी करणार नाही असा पवित्रा सरकारने घेतला आहे. RCEP हा जगातील सर्वात मोठा व्यापारी करार आहे.
- भारत सरकारने मांडलेल्या प्रश्नांचे निरसन झालेले नसल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे.
- भारताने या करारामध्ये काही मागण्या मांडल्या होत्या. या करारात चीनचे नेतृत्व नको, अन्यथा भारतीय व्यापारातील तोटा वाढेल, असे भारताचे म्हणणे आहे.
- UPA सरकारच्या काळात भारताने 74% बाजार आशियाई देशांसाठी खुला केला होता. इंडोनेशियासारख्या धनाढ्य देशांनी 50% बाजार खुला केला होता.
- 2007 साली भारत-चीन FTA साठी तयार झाले होते आणि 2011-12 मध्ये चीनसोबत RCEP करारात सहभागी होण्याची तयारी दर्शवली.
- RCEP हा एक मुक्त व्यापार करार आहे.
- हा आसियान (दक्षिण पूर्व आशियाई राष्ट्र संघटना) मधील 10 सदस्य राष्ट्रांचा मुक्त व्यापार करार आहे.
- या कराराचे सध्या 5 भागीदार आहेत.
- चीन, जपान, दक्षिण कोरिया, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड
- या कराराची घोषणा नोव्हेंबर 2011 मध्ये आसियानच्या 19 व्या शिखर परिषदेत केली गेली.

## टायगर ट्रायम्प

- ह्या सरावामध्ये प्रथमतःच भारत आणि अमेरिका या दोन्ही देशांचे तीनही दल भाग घेणार आहेत. (नाविक दल, हवाई दल, सैनिक दल)
- हा सराव आंध्रप्रदेशातील विशाखापट्टणम् आणि काकीनाडा येथे आयोजित केला जाणार आहे.
- यात आपत्तीच्या काळात मदतीचे अनुकरण करणारे क्षेत्र प्रशिक्षण आणि कार्यक्रमांचा समावेश आहे.
- या अभ्यासामुळे दोन्ही देशांना ज्ञानाची देवाणघेवाण करण्यास आणि व्यावसायिक आणि वैयक्तिक संबंध प्रस्थापित करण्यास मदत होईल.
- हा सराव मानवीय मदत, आपत्ती निवारण आणि दहशतवादाविरुद्ध भारतीय आणि अमेरिकन सैन्याच्या क्षमता वाढवेल.

## डस्टनिक 2019 : भारत, उझबेकिस्तान,संयुक्त सैन्य अभ्यास

- दहशतवादाविरुद्धच्या रणनीतिवर भारत उझबेकिस्तानबरोबर पहिल्यांदा सैन्य सराव करणार आहे.
- हा सैन्य सराव उझबेकीस्तानमध्ये चिरचीक येथे होईल.
- डोंगराळ, ग्रामीण आणि शहरी भागातील दहशतविरोधी कारवाईवर लक्ष केंद्रीत करणे हे या सरावाचे उद्दिष्ट आहे.
- या अभ्यासामुळे दोन सैन्यात आंतरकार्यक्षमता कौशल्य आणि आत्मविश्वास वाढेल आणि दोघांमध्ये युद्धकौशल्याची सर्वोत्तम पद्धतीची देवाण-घेवाण होईल.
- उझबेकिस्तान मध्य आशियातील एक महत्त्वाचा देश

असल्याने भारत सहकाराच्या विविध नवीन क्षेत्रांद्वारे उझबेकिस्तानपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करीत आहे.

## समुद्र शक्ती

- भारत-इंडोनेशिया संयुक्त नौदल सराव.
- हा नौदल सराव बंगालच्या उपसागरात सुरू आहे.
- यावर्षीचा भारत-इंडोनेशिया संयुक्त नौदल सराव ही दुसरी आवृत्ती आहे.
- या सरावात भारताची युद्धनौका आयएनएस कामोर्हा आणि इंडोनेशियाची युद्धनौका केआरआय उस्मान यांचा संयुक्तपणे सहभाग आहे.

## COP 25 माद्रीदमध्ये होणार

- वार्षिक हवामान परिषद COP 25 स्पेनची राजधानी माद्रीदमध्ये होणार आहे.
- ही परिषद 2 ते 13 डिसेंबर 2019 या काळात होणार आहे.

**काय आहे COP?**

- शाश्वत विकास यशस्वी करण्यासाठी एकीकडे शाश्वत विकासाची धोरणे राबवायची आणि दुसरीकडे पर्यावरणाचा ऱ्हास रोखायचा या दुहेरी उद्देशाने संयुक्त राष्ट्रसंघाच्या परिषदा पार पडल्या आहेत.
- 1992 च्या रिओ परिषदेत पाच करार करण्यात आले त्यापैकी UNFCCC (United Nation Framework Convention on Climate Change) संयुक्त राष्ट्रसंघाची पर्यावरण बदलावर अभिसंधी चौकट या कराराने पर्यावरण धोरणाचा पाया रचला.

**UNFCCC करार :**

- 3 ते 14 जून 1992 मध्ये UNFCCC करार संमत करण्यात आला.
- 21 मार्च 1994 रोजी हा करार अंमलात आला.
- या कराराचा उद्देश पर्यावरणातील हरितगृह वायूचे प्रमाण पर्यावरणाला घातक ठरेल एवढ्या स्तरापेक्षा कमी ठेवणे.
- या करारात एकूण 197 सदस्य देश असून कोणावरही हा करार बंधनकारक नाही.
- या कराराची अंमलबजावणी व पर्यावरण बदलाशी संबंधित आढावा घेण्यासाठी 1995 पासून वार्षिक परिषदा आयोजित होत आहेत.
- या परिषदांना संयुक्त राष्ट्रसंघाच्या पर्यावरण बदलावरील परिषदा (UNFCCC - United Nation Climate Change Conference) म्हणतात.
- या सदस्यांची परिषद म्हणून या परिषदेला COP (Conference of the Parties) असे म्हणतात.
- 28 मार्च ते 7 एप्रिल 1995 दरम्यान COP ची पहिली परिषद पार पडली.
- ही परिषद बर्लिन जर्मनी येथे पार पडल्यामुळे हिला 'बर्लिन आदेश' असेही म्हणतात.

## हवामान बदलविषयक BASIC परिषद संपन्न

- हवामानातील बदलविषयक BASIC मंत्रीस्तरीय बैठक 26 ऑक्टोबर 2019 रोजी बीजिंग येथे पार पडली.
- चीनची राजधानी असणाऱ्या बीजिंग शहरात ही 29 वी बैठक होती.
- भारतातर्फे केंद्रीय पर्यावरण मंत्री प्रकाश जावडेकर यांनी प्रतिनिधीत्व केले.

**BASIC गट :**

- यात ब्राझील, दक्षिण आफ्रिका, भारत व चीन या चार देशांचा समावेश होता.
- 28 नोव्हेंबर 2009 सालच्या एका करारातून या गटाची स्थापना झाली.
- 'कोपेनहेगन हवामान परिषद 2009' मध्ये या चारही देशांनी एकत्रितपणे बदलत्या हवामानाच्या विरोधात कार्य करण्याचे ठरवून हा गट निर्माण केला.

**महत्त्वाचे :**

- बीजिंगमधील 29 व्या बैठकीत विकसित देशांनी विकसनशील देशांना 100 अब्ज डॉलर्स मदतीची वचनबद्धता पूर्ण करण्याचे आवाहन केले गेले.

## कानपूर जगातील सर्वाधिक प्रदूषित शहर

- गिनीज वर्ल्ड रेकॉर्डच्या ताज्या आवृत्तीत उत्तर प्रदेशमधील कानपूर शहर सर्वाधिक प्रदूषित शहर म्हणून घोषित झाले आहे.
- ही आवृत्ती दरवर्षी प्रकाशक पेंग्विन रँडम हाऊसद्वारे प्रसिद्ध केले जाते.
- कानपूर शहराची पीएम (Particulate Matter) पातळी 2.5 आहे.

- पीएम 2.5 वायुमंडलातील छोट्या गोलाकार कणांशी संबंधित आहे ज्याचा व्यास 2.5 मायक्रोमीटरपेक्षा कमी आहे.
- पीएम 2.5 मध्ये धूळ, काजळी आणि राख यांचा समावेश होतो. त्यामुळे माणसाला कर्करोग, फुप्फुस आणि हृदयाचे विकार होऊ शकतात.

## अभिजित बॅनर्जी यांना अर्थशास्त्राचे नोबेल

- भारतीय वंशाचे अमेरिकी अर्थशास्त्रज्ञ अभिजित बॅनर्जी यांना 2019 चे नोबेल पारितोषिक जाहीर झाले.
- त्यांच्या समवेत त्यांच्या पत्नी एस्तेर डफलो व मायकेल क्रेमर अशा तिघांना हा पुरस्कार विभागून देण्यात आला आहे.
- 'जागतिक दारिद्र्य निर्मूलनासाठी प्रायोगिक दृष्टिकोन' या विषयावरील संशोधनासाठी त्यांना नोबेल दिला गेला.
- एस्तेर डफलो या अर्थशास्त्रात नोबेल मिळवणाऱ्या दुसऱ्या महिला आणि सर्वात तरुण विजेत्या ठरल्या आहेत. (पहिल्या महिला-इलिनर ऑस्ट्रॉंग, 2009)
- पुरस्काराची रक्कम : 9 लाख 18 हजार डॉलर्स

**महत्त्वाचे :**

- सन 1969 पासून स्वीडनच्या 'स्विस' बँकेने हा पुरस्कार देण्यास सुरुवात केली.
- 'द रॉयल स्वीडिश ॲकॅडमीतर्फे अर्थशास्त्रासाठीच्या नोबेल पुरस्काराची घोषणा होते.
- एकूण 'सहा' क्षेत्रांसाठी नोबेल दिला जातो.

**अभिजित बॅनर्जी :**

- भारतात JNU विद्यापीठात त्यांचे शिक्षण झाले.
- त्यांनी 2002 मध्ये 'अब्दुल लतीफ जमील पॉव्हर्टी ॲक्शन लॅब' स्थापन केली.
- तसेच संयुक्त राष्ट्रांच्या सरचिटणीसांच्या उच्चस्तरीय समितीत त्यांचा समावेश होता.

## भारतीय नाविन्यता निर्देशांक, 2019 (India Innovation Index 2019)

- नवोपक्रम व नाविन्यता भारतातील राज्यांमध्ये वाढावी यासाठी जागतिक नाविन्यता निर्देशांकाचा (GII) धर्तीवर नीति आयोगाने भारतीय नाविन्यता निर्देशांक विकसित केलेला आहे.
- यामध्ये मानवी संसाधन, ज्ञानाधारित श्रम, गुंतवणूक अशा बाबींना विचारात घेतले जाते.
- यावर्षी ही यादी तयार करण्यासाठी इन्स्टिट्यूट ऑफ कॉम्पिटिटिव्हनेस या संस्थेने मदत केली.
- मनुष्यबळ, गुंतवणूक, ज्ञानी कामगार, व्यवसायासाठी वातावरण, सुरक्षितता व कायदेशीर वातावरण यांचा अभ्यास करून ही यादी तयार केली जाते.
- कर्नाटक हे राज्य नवकल्पनात्मक शोधाच्या क्षेत्रात भारतातले अव्वल राज्य ठरले.
- **प्रथम पाच राज्ये :** कर्नाटक, तामिळनाडू, महाराष्ट्र, तेलंगणा, हरियाणा
- ईशान्य व डोंगराळ राज्यांमध्ये प्रथम राज्य : सिक्किम
- केंद्रशासित प्रदेश व छोट्या राज्यांत प्रथम दिल्ली.

**नीती आयोगाविषयी :**

- 1 जानेवारी 2015 ला या संस्थेची स्थापना नियोजन आयोगाच्या जागी करण्यात आली.
- NITI - National Institution for Transforming India (राष्ट्रीय भारत परिवर्तन संस्था)
- ही संस्था थिंक टँक म्हणून काम पाहते.

**रचना :**

- अध्यक्ष : पंतप्रधान
- उपाध्यक्ष : पंतप्रधान नियुक्त करतील, (सध्या राजीवकुमार) हेच या आयोगाचे कार्यकारी प्रमुख असतात.
- सदस्य : सर्व राज्यांचे मुख्यमंत्री व केंद्रशासित प्रदेशाचे नायब राज्यपाल
- काही पंतप्रधान नियुक्त पूर्णवेळ सदस्यही असतील.
- आंतरराज्य परिषद, DBT, UIDAI व कार्यक्रम मूल्यमापन शाखा असे या आयोगाचे चार प्रमुख विभाग आहेत.

## HPCL आणि PGCL या दोन उद्योगांना महारत्न दर्जा

- नुकताच केंद्र सरकारने हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. आणि पॉवर ग्रिड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया या दोन उद्योगांना महारत्न दर्जा दिला आहे.
- त्यामुळे महारत्न उद्योगांची एकूण संख्या 10 झाली आहे.
- यापूर्वीच BPCL या उद्योगाला महारत्न दर्जा देण्यात आला आहे.

**सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग (PSUs) :**

- सार्वजनिक उद्योगांनी विशिष्ट निकष पूर्ण केल्यास त्यांना महारत्न, नवरत्न व मिनिरत्नचा दर्जा देण्यात येतो.
- सध्या 10 महारत्न, 14 नवरत्न आणि 73 मिनिरत्न उद्योग आहेत.

**अ) महारत्न उद्योग :**

महारत्न दर्जा मिळविण्यासाठी खालील निकष पूर्ण करावे लागतात.

- नवरत्न दर्जा असणे.
- मागील 3 वर्षांत वार्षिक सरासरी 25,000 कोटी रुपयांपेक्षा जास्त उलाढाल असणे.
- मागील 3 वर्षांत सरासरी निव्वळ किंमत (Net Worth) 15,000 कोटी रुपये असणे.
- महारत्न दर्जा मिळाल्यावर संचालक मंडळाला खालील अधिकार मिळतात.
- नवीन भांडवली खर्चावर कोणतीही मौद्रिक मर्यादा नसते.
- RBI च्या परवानगीने परदेशी कर्ज घेण्याचा अधिकार मिळतो.
- रचनात्मक परिवर्तन करण्याची मुभा मिळते.

**सध्या 10 महारत्न उद्योग आहेत ते खालीलप्रमाणे**

- Bharat Heavy Electricals Ltd. (BHEL)
- Coal India Ltd. (CIL)
- Gas Authority of India Ltd. (GAIL)
- Indian Oil Corporation Ltd.(IOCL)
- National Thermal Power Corporation Ltd. (NTPC)
- Oil & Natural Gas Corporation Ltd. (ONGC)
- Steel Authority of India Ltd. (SAIL)
- Bharat Petroleum Corporation Ltd. (BPCL)
- Hindustan Petroleum Corporation Ltd. (HPCL)
- Power Grid Corporation Of India Ltd. (PGCL)

**ब) नवरत्न उद्योग :**

हा दर्जा मिळण्यासाठी खालील निकष पूर्ण करावे लागतात.

- मिनिरत्न वर्ग I दर्जा असावा व अनुसूची अ मध्ये नोंद असणे.
- मागील 3 वर्षांत उत्कृष्ट किंवा सर्वोत्तम दर्जा असणे.
- सध्या एकूण 14 नवरत्न उद्योग आहेत.

**क) मिनिरत्न उद्योग :**

- मिनिरत्न वर्ग I हा दर्जा मिळण्यासाठी खालील निकष पूर्ण करावे लागतात.
- मागील 3 वर्षे सतत नफ्यात असणे.
- मागील 3 वर्षांपूर्वी कुठल्याही वर्षात करवजा 30 कोटी रुपयांचा निव्वळ नफा असणे.

## 'ईझ ऑफ डूइंग बिझनेस 2020 जाहीर,

- जागतिक बँकेने (WB), व्यवसाय सुलभीकरणाबाबतचा Ease of Doing Business हा 190 देशांची तुलना करून अहवाल प्रसिद्ध केला.
- या अहवालात दिलेल्या व्यवसाय सुलभीकरणाबाबत जागतिक यादीत भारत 63 व्या क्रमांकावर आहे.
- मागील वर्षी भारत 77 व्या स्थानावर होता.
- या यादीमध्ये भारत सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या 10 देशांपैकी एक आहे.
- अहवालानुसार 10 पैकी 7 वर्गांमध्ये भारताची कामगिरी सुधारली असून दिवाळखोरीचा निपटारा, बांधकाम परवाने, मालमत्ता नोंदणीकरण, सीमेपलीकडील व्यापार आणि कर भुगतान या क्षेत्रांमध्ये भरघोस सुधारणा आहे.
- या यादीत न्यूझीलंड हा सर्वाधिक गुण मिळवणारा देश ठरला आहे.
- त्यापाठोपाठ सिंगापूर, हाँगकाँग, डेन्मार्क, कोरिया, अमेरिका जॉर्जिया, ब्रिटन, नॉर्वे आणि स्वीडन हे देश आहेत.
- बहारीनने सर्वाधिक सुधारणांची अंमलबजावणी केली असून अहवालात मोजलेल्या 10 पैकी 9 क्षेत्रात सुधारणा केली आहे.
- हा अहवाल मोजण्यास WB ने 2006 पासून सुरुवात केली.

## जम्मू व काश्मीर विधानपरिषद विसर्जित

- जम्मू व काश्मीर राज्यप्रशासनाने तेथील विधानपरिषद विसर्जित करण्याचा आदेश काढला आहे.
- जम्मू व काश्मीर पुनर्रचना कायद्यानुसार (2019) हा

आदेश देण्यात आला असून विधानपरिषद रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला.

- म्हणून सध्या तेलंगणा, महाराष्ट्र, कर्नाटक, बिहार, उत्तरप्रदेश व आंध्रप्रदेश या राज्यांमध्येच विधानपरिषद अस्तित्वात आहेत.

**विधानपरिषद :**

- घटनेच्या कलम 169 नुसार संसदेला विधानपरिषद स्थापन किंवा विसर्जित (नष्ट) करण्याचा अधिकार आहे.
- संबंधित राज्याच्या विधानसभेने विशिष्ट बहुमताने ठराव संमत करून संसदेला तशी विनंती करावी लागते.
- विधानपरिषद हे राज्य विधिमंडळाचे वरिष्ठ सभागृह असते.
- विधानपरिषदेचे सदस्य 6 वर्षांसाठी निवडून येतात. दर 2 वर्षांनी $1/3$ सदस्य नव्याने निवडून येतात.

**अटी :**

- सदस्य भारताचा नागरिक असावा.
- वय वर्षे 30 पूर्ण असावे.
- दिवाळखोर / नादार नसावा.
- मानसिकरीत्या स्वस्थ असावा.
- महाराष्ट्रात विधानपरिषदेचे 78 सदस्य आहेत.

**जम्मू व काश्मीर विधानपरिषद :**

स्थापना : 1957, सदस्य : 36

**विधानपरिषदेची रचना :**

**सदस्य :**

- $1/6$ राज्यपालांद्वारे सहकार, साहित्य, विज्ञान, कला इ. क्षेत्रातून
- $1/12$ : पदवीधर मतदारसंघामधून
- $1/12$ : शिक्षक (किमान माध्यमिक स्तर) मतदार संघामधून
- $1/3$ : विधानसभा मतदार संघातून

## जम्मू काश्मीर व लडाखमध्ये नायब राज्यपाल नियुक्त

- जम्मू काश्मीरमध्ये गिरीशचंद्र मुर्मु तर लडाखमध्ये राधाकृष्ण माथूर यांची नायब राज्यपालपदी निवड करण्यात आली.
- दोघेही भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी आहेत.

**नवे राज्यपाल :**

- सत्यपाल मलिक – गोवा
- श्रीधरन पिलाई – मिझोरम
- गिरीशचंद्र मुर्मु – जम्मू काश्मीर
- राधाकृष्ण माथुर – लडाख

**गिरीशचंद्र मुर्मु :**

- भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी
- नरेंद्र मोदी गुजरातचे मुख्यमंत्री असताना राज्याचे मुख्य सचिव होते.

**राधाकृष्ण माथुर :**

- भारतीय प्रशासकीय सेवेतील (IAS) सेवानिवृत्त अधिकारी
- 2013-15 संरक्षण सचिव
- 2018 मध्ये केंद्र सरकारच्या मुख्य माहिती अधिकारी पदावरून निवृत्त.

**पार्श्वभूमी :**

- 5 ऑगस्ट, 2019 रोजी जम्मू काश्मीरला विशेष दर्जा देणारं कलम 370 रद्द.
- 31 ऑक्टोबर 2019 पासून लडाख व जम्मू काश्मीर हे दोन केंद्रशासित प्रदेश अस्तित्वात आहेत.

**महत्त्वाचे :**

- दिल्ली व पाँडेचेरीनंतर जम्मू काश्मीर विधानसभा अस्तित्वात असणारा तिसरा केंद्रशासित प्रदेश असेल.
- राज्यपाल हा राज्यांचा तर नायब राज्यपाल हा केंद्रशासित प्रदेशांचा सर्वोच्च प्रशासकीय अधिकारी असतो.
- राष्ट्रपती 5 वर्षांसाठी त्यांची नियुक्ती करतात.
- सतीश खंडारे यांची लडाखच्या पहिल्या पोलीस महासंचालकपदी नियुक्ती झाली आहे.

## मतदानाच्या दिवशी 'एक्झिट पोल' वर बंदी

- भारतीय निवडणूक आयोगाचा निर्णय
- 21 ऑक्टोबरला महाराष्ट्र व हरियाणा या दोन राज्यांतील विधानसभा निवडणुका आहेत. यांच्याबरोबरच महाराष्ट्रातील सातारा व बिहारमधील समस्तीपूर येथील लोकसभेच्या पोटनिवडणुका होणार आहेत.

**भारतीय निवडणूक आयोग**

- राज्यघटनेच्या कलम 324 नुसार स्थापन केला जातो.
- हा आयोग राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, लोकसभा, राज्यसभा,

विधानसभा व विधानपरिषद यांच्या निवडणुका पार पाडतो.

- हा आयोग एक मुख्य निवडणूक आयुक्त व राष्ट्रपती ठरवतील तेवढ्या अन्य निवडणूक आयुक्त यांचा बनलेला असतो.
- मुख्य आयुक्त व इतर आयुक्त यांची नेमणूक राष्ट्रपती करतात.
- मुख्य निवडणूक आयुक्त व इतर आयुक्तांना सारखेच अधिकार आहेत.

**पदावरून दूर करणे**

- मुख्य निवडणूक आयुक्ताला पदावरून दूर करण्याची पद्धत व त्याची कारणे सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाला दूर करण्याच्या पद्धतीप्रमाणेच असतील. (म्हणजेच दोन्ही सभागृहांनी विशेष बहुमताने ठराव संमत करावा लागेल.)

**पात्रता :**

- घटनेत सांगितलेली नाही.
- घटनेने त्यांचा पदावधी निश्चित केलेला नाही.
- घटनेने निवृत्त सदस्यांना निवृत्तीनंतरच्या सरकारी नेमणुकीपासून प्रतिबंधित केलेले नाही.
- या आयोगाला निवडणुकांच्या संदर्भात प्रशासकीय, सल्लागार, व अर्ध-न्यायिक स्वरूपाचे अधिकार व कार्ये प्राप्त आहेत.
- मुख्य निवडणूक आयुक्त व इतर आयुक्त जरी राष्ट्रपतीकडून नियुक्त केले असतील तरी ते राष्ट्रपतींच्या मर्जीने पद धारण करत नाहीत.

## शरद बोबडे 47 वे सरन्यायाधीश

- 46 वे विद्यमान सरन्यायाधीश रंजन गोगई 17 नोव्हेंबरला निवृत्त होणार आहेत.
- त्यांच्या जागी 47 वे सरन्यायाधीश म्हणून शरद बोबडे यांची नियुक्ती झाली.
- रंजन गोगई यांनी केंद्र सरकारला शरद बोबडे यांचे नाव सुचवले होते.
- सरन्यायाधीश होणारे ते 9 वे मराठी व्यक्ती आहेत.

**यापूर्वीचे मराठी सरन्यायाधीश :**

- यशवंत चंद्रचूड

**कार्यकाळ : (सर्वाधिक)**

- 7 वर्षे 4 महिने

**शरद बोबडे**

- 1998 - मुंबई हायकोर्टात वरिष्ठ वकील
- 2000 - मुंबई हायकोर्टात अतिरिक्त न्यायाधीश
- 2013 सुप्रीम कोर्टात न्यायाधीशपदी रामजन्मभूमी बाबरी मशीद प्रकरणातील सुनावणीच्या विशेष पीठात त्यांचा सहभाग होता.

**सरन्यायाधीशाची नेमणूक :**

- सर्वोच्च न्यायालयाच्या ज्येष्ठतम न्यायाधीशाची नेमणूक सरन्यायाधीशपदी करावी असा संकेत केंद्र सरकारला पाळावा लागतो.
- परंतु 1973 व 1977 साली अनुक्रमे एन. एन. रे आणि एम. यू. बेग यांना तत्कालीन ज्येष्ठ न्यायाधीशांना डावलून सरन्यायाधीशपदी नेमण्यात आले.

**दुसरा न्यायाधीश खटला (1993)**

- सरन्यायाधीशपदी ज्येष्ठतम न्यायाधीशाचीच नेमणूक करण्यात यावी, असा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला.

**पात्रता :**

- घटनेने निश्चित केलेली नाही.
- वयाची 65 वर्षे पूर्ण होईपर्यंत पद धारण करता येते.

**शपथ :**

- सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना राष्ट्रपती शपथ देतात.
- राष्ट्रपतीस संबोधून न्यायाधीश राजीनामा देतात.

## संसदीय कामकाज सुधारणांसंबंधी 15 मुद्द्यांचा मसुदा जाहीर

- केंद्र आणि राज्य विधिमंडळाच्या कामकाजामध्ये परिणामकारकता आणण्यासाठी उपराष्ट्रपती व्यंकैय्या नायडू यांनी हा मसुदा जाहीर केला आहे.

**त्यातील महत्त्वाचे मुद्दे खालीलप्रमाणे :**

- विधीपूर्व आणि नंतरचे परिणाम यांची शहानिशा व्हायला हवी.
- संसदेच्या विभागीय समित्या दरवर्षी गठित न करता त्यांचा कार्यकाल वाढवण्यात यावा.
- संसदेच्या व राज्यविधिमंडळाच्या बैठकींची सभा दरवर्षी ठरवून देण्यात आली.
- कायदा बनवणाऱ्यांनी गृहाच्या कायद्याचे पालन करावे. राजकीय पक्षांनी आचारसंहिता पाळण्याची जबाबदारी

घ्यावी.

- व्यत्यय आणणाऱ्या सदस्यांवर स्वयंचलित प्रभावाने कार्यवाही करतील असे कायदे करावेत.
- राजकीय पक्षांनी गणपूर्तीची समस्या लक्षात घेऊन गृहामध्ये किमान 50% सदस्य उपस्थित असण्याची निश्चिती करावी.
- विधिमंडळाच्या सचिवालयांनी सदस्यांच्या उपस्थितीबाबत नियमित अहवाल प्रकाशित करावा.
- पक्षांतरबंदी कायदा व व्हीप (प्रतोद) यांच्या कार्याचा आढावा घेण्यात यावा.

## आरंभ अभ्यासक्रम

- 'आरंभ' हा नागरी सेवेसाठी निवड झालेल्या अधिकाऱ्यांकरिता पहिला पायाभूत अभ्यासक्रम आहे.
- भारत सरकारच्या नागरी सेवेसाठी निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी भारताचा असा पहिला पायाभूत अभ्यासक्रम आहे.
- हा अभ्यासक्रम गुजरातेतील केवाडियामधील स्टॅच्यू ऑफ युनिटी येथे पदाधिकाऱ्यांना सहा दिवसांचे प्रशिक्षण देऊन सुरू केला गेला.

**भारतीय नागरी सेवा :**

- ब्रिटिश राजवटीत तयार झालेली भारतातील नागरी सेवा.

**मूळ नाव :**

- इंडियन सिव्हिल सर्व्हिस किंवा इम्पिरियल सिव्हिल सर्व्हिस
- पहिल्या लोकसेवा आयोगाची स्थापना - 1926
- सन 1935 च्या कायद्याने 'फेडरल पब्लिक सर्व्हिस कमिशन'ची स्थापना झाली.
- राज्यघटना स्वीकारतेवेळी कमिशनला स्वायत्त दर्जा देत 'केंद्रीय लोकसेवा आयोग' (UPSC) असे नाव देण्यात आले.
- भारतीय संविधानाच्या कलम 315 मध्ये UPSC ची तरतूद आहे.
- IAS ची स्थापना : 26 जानेवारी 1950

**प्रशिक्षण :**

- लाल बहादूर शास्त्री ॲकॅडमी, उत्तराखंड
- केंद्रीय सेवांमध्ये गट 'अ' व गट 'ब' मिळून सुमारे 17 सेवा येतात.

## इंडिजेन जीनोम प्रकल्प

- वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेने 1008 भारतीयांच्या जनुकांची क्रमवारी लावण्याचा प्रकल्प हाती घेतला असून या प्रकल्पामुळे भविष्यातील पिढ्यांना होणाऱ्या संभवित आनुवांशिक आजारांच्या उपचारांमध्ये मदत होणार आहे.
- हा प्रकल्प CSIR - Institute of Genomics & Integrative Biology, नवी दिल्ली आणि CSIR - Centre for Cellular and Molecular Biology हैदराबाद यांनी अंमलात आणला आहे.
- आनुवंशिक शास्त्रामध्ये या प्रकल्पामुळे भरीव मदत होणार आहे.

**CSIR : Council for Scientific & Industrial Research**

- 1942 मध्ये अकार्ट रायस्वामी मुदलियार व शांतीस्वरूप भटनागर यांच्या पुढाकाराने स्थापन झालेली ही एक संशोधन व विकासात्मक संस्था आहे.
- भारताचे पंतप्रधान या परिषदेचे अध्यक्ष असतात.
- मुख्यालय : नवी दिल्ली

**HGP : Human Genome Project**

- Genome म्हणजे मानवाच्या पेशीतील एकूण जनुके
- 1990 मध्ये अमेरिकेच्या पुढाकाराने मानवाच्या संपूर्ण जीनोमचा उलगडा करण्याच्या उद्देशाने हा प्रकल्प 12 देशांनी संयुक्तरीत्या प्रयत्न करून 2003 साली पूर्ण केला.

## 'व्हॉएजर - 2' सूर्यमालेबाहेर

- 'व्हॉएजर -2' या अमेरिकेची संशोधन संस्था 'नासा'च्या यानाने सूर्यमालेबाहेर म्हणजेच आंतरतारकीय अवकाशात प्रवेश केला आहे.
- सौर वादळांपासून तयार झालेली व बुडबुड्यांप्रमाणे असणारी सूर्यमालेची सीमा यानाने ओलांडली आहे.

**यानाचे प्रक्षेपण :**

- 1977 साली प्रक्षेपित.
- व्हॉएजर - 2 हे सूर्यमालेबाहेर प्रवेश करणारे दुसरे यान ठरले आहे.
- यापूर्वीच व्हॉएजर १ यानाने आंतरतारकीय अवकाशात प्रवेश केला होता.

**प्रक्षेपण :** 1977 (व्हॉएजर-२ च्या आठवड्यापूर्वी)

**महत्त्वाचे :**

- यानावरील प्लाझ्मा लहरी उपकरणामुळे त्यांची स्थिती कळते.
- यापूर्वी 2018 मध्ये नासाने 'पार्कर सीलर प्रोब' यान सूर्याच्या दिशेने पाठविले होते.

**नासा (NASA-National Aeronautics and Space Administration)**

- अमेरिकन अंतराळ संशोधन संस्था
- स्थापना 1958

**देश आणि अंतराळ संशोधन संस्था :**

- भारत ISRO
- जपान IAXA
- इस्रायल ISA
- पाकिस्तान SUPARCO

## राफेल ग्रोसी IAEAचे नवे महासंचालक

- अर्जेंटिनाच्या राफेल मारियानो ग्रॉसी यांची आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा एजन्सीचे नवे महासंचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.
- 58 वर्षीय ग्रॉसी यांची नियुक्ती चार वर्षांच्या मुदतीसाठी केली जाईल आणि 'जानेवारी 2020' नंतर त्यांचा कार्यभार स्वीकारले जाईल.
- ते आयएईएचे सहावे प्रमुख असतील.
- IAEA ही एक आंतरराष्ट्रीय संस्था आहे. जी अणुऊर्जेच्या शांततेत वापरास प्रोत्साहन देते तसेच आण्विक शस्त्रासह कोणत्याही लष्करी उद्देशासाठी अणुऊर्जेचा वापर करण्यास प्रतिबंध करते.
- स्थापना 29 जुलै 1957 रोजी ऑस्ट्रियामधील व्हिएन्ना येथे मुख्यालयासह झाली.
- स्वत:च्या आंतरराष्ट्रीय कराराच्या माध्यमातून ही एक स्वायत्त संस्था म्हणून तयार केली गेली.
- जरी आयएईए स्वतंत्रपणे संयुक्त राष्ट्रातून स्थापित केले गेले असले तरी ते संयुक्त राष्ट्र महासभा आणि संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषद या दोघांनाही अहवाल देते.

## शक्ती 2019 : इंडो-फ्रेंच संयुक्त सराव

- भारत आणि फ्रेंच सैन्याचा संयुक्त सैन्य द्विवार्षिक अभ्यास भारत आणि फ्रान्समध्ये वैकल्पिकरीत्या आयोजित केला आहे.
- राजस्थानमधील महाजन फिल्ड फायरिंग रेंज येथील फॉरेन ट्रेनिंग नोड येथे हा सराव केला जाणार आहे.
- हा सराव संयुक्त राष्ट्रांच्या मंडळाच्या अंतर्गत अर्थ वाळवंटातील काऊंटर टेररिझम ऑपरेशनवर केंद्रित असेल.
- दोन सैन्यामधील सहकार्य, समज आणि आंतर कार्यक्षमता वाढविणे हे त्याचे उद्दिष्ट आहे.

## मुख्यमंत्री कन्या सुमंगल योजना

- उत्तरप्रदेश राज्य सरकारने या योजनेची घोषणा केली.

**योजनेतील महत्त्वाच्या तरतुदी**

- राज्यातील मुलींना सक्षम बनविणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे.
- ज्या कुटुंबात मुलीचा जन्म झाला त्या कुटुंबास 15 हजार रुपयांची मदत दिली जाणार.
- डीबीटी (डायरेक्ट बँक ट्रान्स्फर) पद्धतीने ही रक्कम लाभार्थ्यांना मिळणार.
- मुलीचे लसीकरण, इयत्ता 1, 5, 9 व पदवीमधील त्यांचा प्रवेश असे टप्पे पार केल्यानंतरच ही रक्कम क्रमाक्रमाने दिली जाणार.
- या योजनेसाठी डिजिटल व्यासपीठ तयार केले जाणार.

**महत्त्वाचे :**

- महाराष्ट्र सरकारने 2017 सालीच अशा पद्धतीची 'माझी कन्या भाग्यश्री' योजना सुरू केली आहे.

**उद्दिष्ट :**

- बाल लिंग गुणोत्तरात मुलींचे प्रमाण वाढावे यासाठी.

**तरतुदी :**

- सुरुवातीला ही योजना मर्यादित स्वरूपात होती आता मात्र ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न 7.5 लाखापर्यंत आहे त्यांनाही योजनेचा लाभ मिळणार आहे.
- मुलीचे 6, 12 व 18 वर्षे पूर्ण झाल्यानंतर 50 हजारांची रक्कम टप्प्याटप्प्याने मिळाल्याची काही अटींनिशी तरतूद आहे.

**काही आकडेवारी**

- बाललिंग गुणोत्तर म्हणजे 0-6 वयोगटातील दर एक हजार मुलांमागे असणारे मुलींचे प्रमाण.
- 2001 नुसार भारतातील बाल-लिंग गुणोत्तर 927 (2011 नुसार 919)

- सर्वाधिक : मिझोराम 970
- सर्वात कमी : 834
- 2011 नुसार महाराष्ट्राचे बाल–लिंग गुणोत्तर 894

## 2020 पासून स्मार्ट शहरे अभियानाची द्वितीय फेरी

- जून 2015 साली 'स्मार्ट सिटी' या अभियानास सुरुवात केली गेली.
- 2020 पासून 'स्मार्ट सिटी' व 'अमृत' या शहरी विकास योजनांची द्वितीय फेरी प्रस्तावित आहे.
- 'स्मार्ट सिटी' व 'अमृत' या योजना 'केंद्रीय गृह व शहरी कल्याण' मंत्रालयातर्फे राबवल्या जात आहेत.

**अमृत** (Atal Mission for Rejuvenation and Urban Transformation)

**सुरुवात :**

- जून 25, 2015

**उद्देश :**

- लोकांच्या शहरी जीवनमानाा दर्जा सुधारण्यासाठी स्वच्छ, शाश्वत व पर्यावरणपूरक शहरे तयार करण्यासाठीची पंचवार्षिक योजना.

**स्मार्ट सिटी :**

- भारत सरकारचा नागरी पुनर्नवीकरण व सुधारणा कार्यक्रम

**सुरुवात :** जून 2015

**पहिल्या फेरीत :** 100 शहरे (महाराष्ट्रातील 10)

**वैशिष्ट्ये :**

- पाणी, वीजपुरवठा, कचरा व्यवस्थापन, नागरी वाहतूक, नागरिक सुरक्षितता इ.

**महत्त्वाचे :**

- शहरांच्या विकासासाठी 'स्मार्ट सिटीज कौन्सिल फॉर इंडिया' ही संस्था स्थापन केली ही संस्था अमेरिकेच्या स्मार्ट सिटीज कौन्सिलची सदस्य आहे. जी 140 देशांत काम करते.

## ओदिशाचे 'एक भारत श्रेष्ठ भारत' अंतर्गत महाराष्ट्राबरोबर टॅग

- आपापल्या राज्यातील कला, संस्कृती आणि पर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी ओडिशा राज्याने महाराष्ट्राबरोबर टॅग केले आहे.
- ज्या अनुषंगाने महाराष्ट्रातील सांस्कृतिक गट ओदिशा राज्यातील भुवनेश्वर येथे महाराष्ट्राची कला, संस्कृती जसे की पोवाडा, लावणी, तमाशा सादर करतील तसेच ओदिशातील सांस्कृतिक गट, महाराष्ट्रामध्ये ओदिशाची कला, संस्कृती सादर करतील ज्यामुळे दोन राज्यांतील नागरिकांमधील संबंध दृढ होतील.

**एक भारत श्रेष्ठ भारत :**

- देशाला एकत्रित करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणारे सरदार पटेल यांना आदरांजली वाहण्यासाठी केंद्र सरकारने हा उपक्रम सुरू केला आहे.
- या उपक्रमांतर्गत भारतातील वेगवेगळ्या राज्यांमधील लोकांमध्ये बंध निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे.
- केंद्र सरकारने हा उपक्रम 31 ऑक्टोबर 2015 रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त सुरू केला आहे.

## शिरूई लिली उत्सव : मणिपूर

- मणिपूरमधील उखरूल जिल्ह्यामध्ये 16 ते 19 ऑक्टोबर दरम्यान हा उत्सव साजरा केला गेला.
- शिरूई लिली हे मणिपूरचे राज्यफूल आहे.

**मणिपूर :**

- मणिपूरमधील उखरूल जिल्ह्यामध्ये अंगामी, फुकी वतांखूल नागा या आदिवासी जमाती प्रामुख्याने आढळतात.
- राज्यप्राणी : संगाई हरीण
- राज्यभाषा : मैतेयी (मणिपुरी)
- लोकतक सरोवर : या सरोवरामध्ये 'फुमदी' हे वैशिष्ट्य बघण्यास मिळते. सरोवरातील पाण्यावर घन पदार्थांचे मोठमोठे तुकडे म्हणजे हे फुमदी होत.
- अशाच फुमदींवर कैबुल लामजो राष्ट्रीय उद्यान असून हे जगातील एकमेव तरंगते राष्ट्रीय उद्यान आहे. तसेच दुर्मिळ अशा संगाई हरणाचे ते निवासस्थान आहे.

## राष्ट्रीय संस्कृती महोत्सव

- 14 ऑक्टोबर 2019 पासून मध्य प्रदेशातील जबलपूर शहरात दहाव्या राष्ट्रीय संस्कृती महोत्सवास प्रारंभ झाला.

- भारत सरकारच्या 'संस्कृती' मंत्रालयातर्फे या महोत्सवाचे आयोजन केले गेले.

**वैशिष्ट्ये :**
- हा कार्यक्रम जबलपूर, सागर व रीवा या तीन ठिकाणी टप्प्याटप्प्याने आयोजित केला जाईल.

**उद्घाटक :**
- राज्यपाल : लालजी टंडन

**महत्त्वाचे :**
- संस्कृती मंत्रालय 2015 पासून राष्ट्रीय संस्कृती महोत्सवाचे आयोजन करते.

**उद्देश :**
- वैविध्यपूर्ण भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविणे.
- प्रल्हाद सिंह पटेल - राज्यमंत्री (संस्कृती मंत्रालय)
- जबलपूर हे मध्य प्रदेश उच्च न्यायालयाचे ठिकाण आहे.
- जबलपूर शहरास 'संस्कारधानी' असेही संबोधले जाते.

## चेनानी–नाशेरी बोगद्याला श्यामाप्रसाद मुखर्जींचे नाव

- आशियातील सर्वात लांब असणाऱ्या चेनारी–नाशेरी बोगद्याला श्यामाप्रसाद मुखर्जी यांचे नाव देण्यात येणार आहे.

**चेनानी–नाशेरी बोगदा**
- राष्ट्रीय महामार्ग क्र. 44 वर हा बोगदा आहे.
- जम्मू काश्मीर या दोन ठिकाणांना हा बोगदा जोडतो.
- लांबी : 9.025 कि. मी.
- सुमारे 1000 मी. उंचीवर हा बोगदा आहे.
- लेन - 2
- बांधण्याचा कालावधी : 7 वर्षे

**जगातील सर्वात लांब बोगदे :**
- लार्डेल बोगदा, नॉर्वे - 25 कि.मी.
- यामते बोगदा, जपान - 18 कि.मी.

**श्यामाप्रसाद मुखर्जी :**
- जनसंघाचे संस्थापक
- 'एक निशान, एक विधान व एक प्रधान' असा मंत्र त्यांनी देशाला दिला.
- स्वतंत्र भारताच्या पहिल्या मंत्रीमंडळात ते 'वाणिज्य व उद्योग' मंत्री होते.

## BCCI च्या अध्यक्षपदी सौरव गांगुली

- BCCI (Board of Control for Cricket in India) च्या अध्यक्षपदी भारताचा माजी कर्णधार सौरव गांगुली याची निवड झाली आहे.
- भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार सौरव गांगुली हा BCCI चा 39 वा अध्यक्ष आहे.
- 38 वे अध्यक्ष : सी. के. खन्ना (2017-2019)

**भारतीय क्रिकेट नियामक मंडळ**
- BCCI ही भारतातील क्रिकेटचे नियमन करणारी संस्था आहे.
- स्थापना - 1923
- मुख्यालय - मुंबई
- कार्यक्षेत्र - भारत
- संबंध - आंतरराष्ट्रीय क्रिकेट समिती
- BCCI ही एक स्वायत्त संस्था आहे.

**सौरव गांगुली**
- भारताकडून कसोटी व एकदिवसीय क्रिकेट खेळणारा क्रिकेटपटू आहे.
- 49 कसोटी सामन्यांत त्याने भारताचे नेतृत्व केले आहे.
- भारताकडून 100 पेक्षा जास्त कसोटी सामने खेळलेला 7 वा खेळाडू आहे.
- गांगुलीच्या नावे 15 कसोटी शतके आणि 22 एकदिवसीय सामन्यांतील शतके आहेत.

## जेसीबी पारितोषिक 2019 माधुरी विजय हिला जाहीर

- 27 वर्षीय माधुरी विजयने आपल्या 'द फार फील्ड' या कादंबरीसाठी 'जेसीबी पारितोषिक 2019' जिंकले आहे.
- तिला हेनफील्ड आणि पुष्कार्ट पुरस्कारदेखील प्राप्त आहेत.

**जेसीबी पारितोषिक :**
- 2018 मध्ये स्थापन केलेला हा वार्षिक भारतीय साहित्यिक पुरस्कार आहे.
- भारतीय लेखकाने इंग्रजीमध्ये लिहिलेल्या कादंबरीला हा पुरस्कार दिला जातो.
- 2018 चा पहिला जेसीबी पारितोषिक बेन्यामीन यांच्या 'जास्मीन डेज' या कादंबरीला मिळाला आहे.

## बुकर पुरस्काराचे वितरण

- मागरिट अॅटवूड आणि बर्नार्डिन एव्हरिस्टो या दोन

अनुक्रमे कॅनेडियन व आफ्रो-ब्रिटिश लेखिकांना 2019 चा मॅन बूकर पुरस्कार मिळाला.
- दरवर्षी एकाच व्यक्तीला हा पुरस्कार दिला जातो मात्र या वर्षी नियमात बदल करून तो दोन व्यक्तींना दिला गेला.

**महत्त्वाचे :**
- मार्गारेट या बुकर पुरस्कार मिळविणाऱ्या सर्वात वयोवृद्ध व्यक्ती आहेत तर एव्हरिस्टो या बुकर पुरस्कार मिळवणाऱ्या पहिल्याच कृष्णवर्णीय महिला आहेत.

**लेखनसाहित्य :**
- मार्गारेट ॲटवूड यांच्या 'टेस्टामेण्ट्स्' या कादंबरीस एव्हरिस्टो यांच्या 'गर्ल, वुमन, अदर' या कादंबरीस हा पुरस्कार मिळाला.
- ॲटवूड यांना 'द ब्लाइंड ॲससिन' या पुस्तकासाठी यापूर्वीच बुकर पुरस्कार मिळाला होता.

**बर्नार्डिन यांनी स्थापन केलेल्या संस्था**
- थिएटर ऑफ दी ब्लॅक वुमन
- दी स्प्रेड दी वीर्ड रायटर डेव्हलपमेंट एजन्सी

**पुरस्काराविषयी :**
- हा पुरस्कार राष्ट्रकुलचे सदस्य देशातील लेखकांना त्यांच्या इंग्रजी भाषेतील साहित्याला देण्यात येणारा प्रतिष्ठेचा पुरस्कार आहे.
- सुरुवात : 1969
- 2019 चा 50 वा बुकर पुरस्कार
- पुरस्काराची रक्कम : 60 हजार पौंड
- आतापर्यंत 5 भारतीयांना हा पुरस्कार मिळाला.

## 2018 चा व्यास सन्मान लीलाधर जगुरी यांना प्रदान

- 28 वा व्यास सन्मान प्रख्यात हिंदी कवी आणि लेखक लीलाधर जगुरी यांना त्यांच्या 'जितने लोग उतने प्रेम' या संग्रहासाठी प्रदान करण्यात आला आहे.
- प्रख्यात लेखक आणि अभ्यासक गोविंद मिश्रा यांनी त्यांच्या काव्यसंग्रहासाठी जगुरी यांना प्रतिष्ठित पुरस्काराने सन्मानित केले.
- 'जितने लोग उतने प्रेम' हा काव्यसंग्रह जगुरी यांच्या कवितांचा 12 वा कवितासंग्रह आहे.

**व्यास सन्मान पुरस्कार**
- हा प्रतिष्ठित पुरस्कार 1991 मध्ये सुरू करण्यात आला.
- हा पुरस्कार विशेषत: हिंदी साहित्यातील योगदानाबद्दल गौरविण्यात येतो.
- हा पुरस्कार के. के. बिर्ला फाउंडेशनतर्फे हिंदी भाषेतील उल्लेखनीय साहित्यिक कामांबद्दल भारतीय लेखकांना कवींना देण्यात येतो.
- 27 वा 2017 चा व्यास सन्मान पुरस्कार हिंदी लेखिका ममता कालिया यांना त्यांच्या 'दुःखम् सुखम्' या कादंबरीसाठी दिला गेला होता.

# दिनविशेष

## 15 ऑक्टोबर : जागतिक विद्यार्थी दिन, डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम जन्मदिवस

- 2010 साली संयुक्त राष्ट्रसंघाने (UN) 15 ऑक्टोबर हा दिवस 'जागतिक विद्यार्थी दिवस' म्हणून जाहीर केला.
- विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात डॉ. कलाम यांच्या कर्तृत्वाचा तसेच वैज्ञानिक आणि राजकीय कारकीर्दीत शिक्षक म्हणून त्यांनी केलेल्या उत्कृष्ट कामगिरीचा सन्मान करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो.

**डॉ. अब्दुल कलाम यांच्याविषयी :**
- जन्म : 15 ऑक्टोबर 1931 तामिळनाडूमधील रामेश्वरम् येथे
- भारताचे माजी राष्ट्रपती व 'मिसाईल मॅन' अशी ओळख.
- भारताचे 11 वे राष्ट्रपती होते. (कार्यकाळ : 2002 ते 2007)
- ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी डीआरडीओ आणि इस्रो हे प्रामुख्याने चार दशके एक वैज्ञानिक म्हणून हाताळले.
- 'अग्नी' क्षेपणास्त्राच्या यशस्वी चाचणीमुळे त्यांचे जगभर कौतुक झाले.
- भारताच्या सुरक्षेतील सर्वात महत्त्वाच्या पोखरण अणुचाचणीचे (11 मे 1998) ते जनक होते.
- महान शास्त्रज्ञ आणि भारताचे राष्ट्रपती कलाम हे लहान-सहान गोष्टींत आनंद शोधत असत. लहान मुलांशी गप्पा मारणे, भरपूर वाचन हे त्यांचे छंद होत.
- 2020 रोजी भारत महासत्ता होण्याचे स्वप्न त्यांनी Vision 2020 म्हणून मांडले होते.

**पुरस्कार :**
- 1981 : पद्मभूषण
- 1990 : पद्मविभूषण
- 1997 : भारतरत्न

- 1997 : इंदिरा गांधी राष्ट्रीय एकात्मता पुरस्कार
- 2000 : रामानुजन पुरस्कार

- 2015 मध्ये बंगालच्या उपसागरात ओदिशाच्या किनाऱ्याजवळ असलेल्या व्हीलर या बेटाचे नामांतर अब्दुल कलाम बेट असे करण्यात आले.

**महत्त्वाची पुस्तके**

- अग्निपंख (आत्मचरित्र)
- Scientist to President
- Turning Points
- Target 3 million
- Ignited Minds : unleashing the power within India
- India 2020

## 17 ऑक्टोबर : आंतरराष्ट्रीय दारिद्र्य निर्मूलन

- सुरुवात : 1992 पासून
- संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेने (UNGA) 1992 मध्ये दरवर्षी 17 ऑक्टोबर हा 'आंतरराष्ट्रीय दारिद्र्यनिर्मूलन दिन' आयोजित करण्याचा प्रस्ताव जाहीर केला.
- या दिवशी दारिद्र्यनिर्मूलनासाठी विविध राष्ट्रांकडून केले जाणारे प्रयत्न, विविध विकासकामे व योजना यासंबंधी माहिती जाहीर केली जाते.
- अत्यंत गरिबी, हिंसा आणि उपासमारीमुळे बळी पडलेल्यांच्या सन्मानार्थ 17 ऑक्टोबर 1948 रोजी पॅरिसमध्ये 1 लाखाहून अधिक लोक एकत्र येऊन 'मानवाधिकार सार्वत्रिक घोषणापत्रावर' स्वाक्षऱ्या करण्यात आल्या म्हणून या दिवसाला स्मरून या तारखेची निवड करण्यात आली.

**2019 ची थीम :**

- 'Acting Together To Empower children, their families and communities to end poverty.'
- उद्देश : जगभरामध्ये गरीबी हटविण्यासाठी केल्या जाणाऱ्या प्रयत्नांच्या बाबतीत जागरूकता वाढवणे.

**दारिद्र्य म्हणजे काय ?**

- **निरपेक्ष दारिद्र्य (Absolute Poverty) :** ज्यावेळी दारिद्र्य मोजताना कुठल्यातरी निरपेक्ष मानकाचा वापर केला जातो. तेव्हा त्याला निरपेक्ष दारिद्र्य असे म्हणतात. उदा. 1974 मधील नियोजन आयोगाच्या कॅलरीमूल्य मानकानुसार, ग्रामीण भागात ज्याला प्रतिदिन 2400 कॅलरी अन्न मिळू शकत नाही तो दारिद्र्यरेषेखाली (Below Poverty line) समजला जाई.
- भारतात दारिद्र्य मोजण्यासाठी निरपेक्ष दारिद्र्य विचारात घेतात.
- जागतिक बँक (WB) देखील 'प्रतिव्यक्ती प्रतिदिन' '1.9 डॉलर क्रयशक्ती' हे निरपेक्ष मानक वापरते.
- **सापेक्ष दारिद्र्य (Relative Poverty) :** या संकल्पनेत एकूण श्रीमंत व गरीब यांची तुलना करून एक सरासरी काढली जाते व त्या सरासरीपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या लोकांच्या दारिद्र्यामध्ये विचार केला जातो.
- 'त्याच्यापेक्षा हा गरीब' याला सापेक्षता म्हणतात.

**भारत सरकारचे प्रयत्न :**

- 1999 साली दारिद्र्य निर्मूलनासाठी 'स्वर्ण जयंती ग्राम रोजगार' योजना सुरू.
- योजनेतील कमतरता दूर करण्यासाठी आर. राधाकृष्ण समिती.

**समितीच्या शिफारसीनुसार :**

- 2011 पासून 'राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान' सुरू (NRLM)

**योजनेचा उद्देश :**

- गरीबांना बचत गटाच्या माध्यमातून स्वयंरोजगार उपलब्ध करून देणे.

भारतात दारिद्र्य मोजणीसाठी पुढील समित्या स्थापन केल्या गेल्या.

- अलघ समिती - 1979
- लकडावाला समिती - 1989
- सुरेश तेंडुलकर समिती - 2009
- रंगराजन समिती - 2012
- यापैकी रंगराजन समितीनुसार भारतात 2011-12 साली 29.5% दारिद्र्य होते.
- दारिद्र्य रेषेखालील सर्वाधिक लोकसंख्या : उत्तरप्रदेश, बिहार, मध्यप्रदेश

**दारिद्र्य रेषेखालील सर्वाधिक प्रमाण**

- छत्तीसगढ - 47.9%
- मणिपूर - 46.7%
- ओरिसा - 45.9%
- सर्वात कमी प्रमाण अंदमान व निकोबारमध्ये 6% होते.